स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत लोकप्रशासन या विषयात पीएच.डी संशोधनाचा संक्षिप्त आराखडा

:संशोधन विषय :

महाराष्ट्र शासनाचे जलयुक्त शिवार अभियान- एक प्रशासकीय अभ्यास विशेष संदर्भ लातूर जिल्हा

: संशोधक :

तिरकमटे निवृत्ती तुकाराम

मु.पो.वाढवणा खुर्द ता.उदगीर जि.लातूर

: संशोधन मार्गदर्शक :

प्रा.डॉ.बी.आर कत्तुरवार

(विभाग प्रमुख, लोकप्रशासन)

समन्वयक : लोकप्रशासन संशोधन केंद्र,

देगलूर महाविद्यालय, देगलूर

महाराष्ट्र शासनाचे जलयुक्त शिवार अभियान- एक प्रशासकीय अभ्यास

विशेष संदर्भ लातूर जिल्हा

प्रस्तावना :-

भारत हे एक विकसनशील व कृषीप्रधान राष्ट्र आहे. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत जलसिंचनाला अनन्यसाधारण महत्व असते. मानवच्या महत्वपूर्ण गरजा पैकी पाणी ही महत्वची गरज आहे. नेमकी हीच गरज पूर्ण करणे आज शासन स्तरावर जिकरीचे बनले आहे. दिवर्सेन-दिवस वाढत चालेल्या निसर्गाच्या लहारीपणामूळे पर्जन्यमान प्रचंड कमी झाले आहे. शासन स्तरावरुन आज विविध राज्यांमध्ये पणी प्रश्नावर वेगवेगळया योजना राबवून जलस्त्रोत वाढवण्याचा प्रचंड प्रयत्न चालू असताना दिसत आहे.

शुध्द पाणी, स्वच्छ हवा, सुंदर परीसर, स्वच्छ गाव बाबींवर महाराष्ट्र शासनाचा प्रचंड भर आहे. शासनाने विविध अभियानांच्या माध्यमातून भूजल पातळी वाढवण्याचा प्रचंड प्रयत्न करीत आहे. देशातील बहूतांश लोक हे शेती व्यवसायवर अवलंबून आहेत. शेतीचा विकास हा पाण्याशिवाय शक्य नाही. आज महाराष्ट्रात पावसाची अनयिमीतता व पावसातील खंड यामूळे सतत टंचाई सद्रश परिस्थिती निर्माण होऊन त्याचा मोठा परीणाम कृषी क्षेत्रावर होत आहे. राज्यातील सिंचनाच्या सुविधांचा विचार करता मर्यादीत सिंचन सुविधा (जल व सिंचन आयोगाच्या अहवालानुसार संपूर्ण सिंचन क्षमता उपयोगात आणली तरी ४४% क्षेत्र कारेडवाहूच आहे. मागील चार दशकात कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात चढ उतार होताना दिसून येत आहे. या जलयुक्त शिवाय योजनेच्या माध्यमातून शाश्वत शेतीसाठी पाणी व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करण्यात येणार आहे. याअगोदर ‘पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम’, ‘जलस्वराज्य प्रकल्प’ पाणी आडवा-पाणी जिरवा’ या सारखे अनेक अभियान शासनाने यापूर्वी राबवले आहेत. परंतू त्या अभियानांना म्हणावे तसे यश आले नाही. महाराष्ट्रातील इ.स. २०१४ मध्ये पर्जन्यमानत २०% पेक्षा जास्त घट झालेले १८४ तालुके आहेत तर ७२ तालुक्यात भूजल पातळीत ३ मीटर पेक्षा जास्त घट झालेले. तर १ ते २ मीटरपेक्षा जसत घट

झालेले १८८ तालुके (२२३४ गावे) आहेत. या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तिव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती म्हणून २५ नोव्हेंबर २०१४ च्या शासन निर्णयान्वये २२ जिल्हयातील १९०५९ गावांमध्ये टंचाई सदृश्य परिस्थती जाहीर केली होती. या सर्व परिस्थीतीचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने गेल्या दोन वर्षात सिंचन क्षेत्रात विविध उपक्रम राबवले आहेत. महात्मा फुले जल व भूमी संधारण अभियान राबवण्यात आले तसेच लातूर जिल्हयाने गत २०१४-१५ व २०१५-१६ वर्षात प्रचंड मोठा दूष्काळ पहिला आहे. सर्व जलस्त्रोत आटल्यनंतर रेल्वेने पाणी पूरवठा करावा लागला. यावर्षी तलावातील गाळ काढणे, विहीर पूर्नभरण, पाणी आडवीणे व जिरवीने कामे करण्यात आले. या सर्व कामांच्या माध्यमातून ८.४० टीएमसी क्षमतेचे विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करण्यात आले म्हणूनच भूजल पातळीत १ ते ३ मीटरने वाढ झाल्याचे दिसून येते.

या सर्व कार्यक्रमाची निष्पत्ती विचारात घेता सर्वांसाठी ‘पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९’ करण्यासाठी व या टंचाई परिस्थितीवर मात करुन पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी ‘जलयुक्त शिवार अभियान २०१५’ पासून प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या अभियानात प्रशासकीय अधिकारी, एन.जी.ओ. व प्रसारमाध्यमे इ. घटकांची भुमिका जाणुन घेणे लोकप्रशासन शास्त्राचा विद्यार्थी म्हणून आवश्यक आहे.

उद्दिष्टे:-

१. महाराष्ट्रातील लातूर जिल्हयातील भिषण पाणी टंचाईची समस्या का उद्‌भवली याचा शोध घेणे.

२. महाराष्ट्र शासनाच्या जलयूक्त शिवार अभियानाची उद्दिष्ट जाणून घेणे

३. जलयूक्त शिवार योजनेमध्ये लोकसहभाग किती आहे. हे जाणून घेणे.

४. जलयुक्त शिवार अभियानाच्या आंमलबजावणी संदर्भातील प्रशासकीय कार्यपध्दती जाणून घेणे

५. भूगर्भातील पाणी पातळीत कितपत वाढ झाली आहे हे जाणून घेणे

६. जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रशासकीय यंत्रणेच्या भूमिकेचे तटस्थ मूल्यमापन करणे

७. जलयुक्त शिवाय अभियानाच्या अमलबजावणीतील प्रसार माध्यमाची भुमिका जाणून घेणे.

गृहीतके :-

१. जलव्यवस्थापनाच्या अभावामूळे लातूर जिल्हयात भिषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे.
२. जलयूक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीमूळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली आहे.
३. जलयूक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीत शेतकरी व अन्य नागरीक सक्रीयपणे सहभागी झाले आहेत.
४. जलयूक्त शिवार अभियानात स्वयंसेवी संस्थांची भूमीका महत्वपूर्ण आहे.
५. जलयुक्त शिवार अभियानात पाणी टंचाईची समस्या टप्प्या-टप्याने कमी होत आहे.
६. जलयूक्त शिवार अभियानातील प्रशासकीय यंत्रणा प्रभावीपणे काम करीत नाही.

संशोधन आराखडा :

१. संशेधनाची व्याप्ती :-

संशोानाची व्याप्ती लातूर जिल्हयातील भौगोली क्षेत्रापूर्ती मर्यादीत आहे.

२. तथ्यसंकलन :-

तथ्य संकलनाचे दोन स्त्रोत संशोधनासाठी उपयोगात घेण्यात येतील.

अ) प्राथमीक स्त्रोत :-

संशोधन करताना १) अवलोकन (Observation) २) अनसूची (Schedule) ३) मूलाखत (Interview) ४) प्रश्नावली (Questionary) इ माध्यमातून तथ्यसंकलन केले जाईल.

ब) दुय्यम स्त्रोत :-

दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून प्रकाशीत किंवा अप्रकाशीत सामूग्री तसेच पत्र, सार्वजनिक प्रलेख, शासकीय संस्थांचे अहवाल, दैनीक, मासीके, साप्ताहीके, विशेषांक, संशोधन पत्रिका याचा वापर करण्यात येणार आहे.

३. नमूना निवड :-

सदरील संशोधन पध्दतीत यादृचीक नमूना निवड पध्दतीनूसार निवड केली जाणर आसून लातूर जिल्हयातील एकूण १० तालुक्यातील प्रत्येकी ५ गावांची निवड करण्यात येणार आहे व त्या गावातील प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या १० % शेतकरी , नागरीकांनी व संबंधीत प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी व लोकप्रतिनिधी, एन.जी.ओ. चे पदाधिकारी इ. घटकांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत.

प्रकरणे :-

१. प्रस्तावना
२. भारतातील जलसिंचनाची ऐतीहासीक पार्श्वभूमी
३. जलयुक्त शिवार अभियान पार्श्वभूमी उद्दिष्टे व कार्यपध्दती
४. लातूर जिल्हा एक दृष्टीक्षेप
५. लातूर जिल्हयातील पाणीटंचाईची कारणे व परिणाम (इ.स. २०१४ ते २०१६)
६. जलयुक्त शिवाय अभियानात विविध घटकांची भूमिका
७. निष्कर्ष व उपाय योजना

संदर्भ सूचीः-

१. शासन निर्णय क्रमांक- जलअ-२०१४/प्रक्र.२०३/जल-७ दिनांक.०५ डिसेंबर २०१४

२. शासन शुध्दीपत्रक दिनांक.२८ जानेवारी २०१५

३. शासन आदेश क्रमांक- सीडीए-१०१५/२०१५ लाक्षेविकामे दि.३१ जानेवारी २०१५

४. जलसंवर्धन सामूहीक पध्दती - नाबार्ड

५. पाणी हेच जिवन मोहीम -२०१७-१८ Dated.०९ May-२०१७, स.एन.बी-डीडीराम लातूर नाबार्ड

६. ग्रामीण विकासाचा अरुणोदय, मराठवाडा वैधानीक विकास मंडळ, औरंगाबाद

७. संशोधन पध्दती- डॉ.गुरुनाथ नाडगोंड

८. डॉ.घोटाळे रा.ना- समाजशास्त्रीय संशोधन त्वे व पध्दती

९. डॉ.आगलोव प्रदीप- संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे

१०. डॉ.भांडारकर पू.ल- सामाजीक संशोधन पध्दती

संशोधनक मार्गदर्शक

प्रा.डॉ.बी.आर. कत्तुरवार

लोकप्रशासन संशोधन केंद्र

देगलूर महाविद्यालय, देगलूर

संशोधक

तिरकमटे निवृत्ती तुकाराम

मु.पो.वाढवणा खुर्द ता.उदगीर जि.लातूर